फिर्याद

अमळनेर पोलीस स्टेशन
दिनांक २४.१०.२०२१

मी अरुण श्रावण गव्हाणे, वय ३९ वर्षे, व्यवसाय शेती,रा.पाडसे, ता. अमळनेर जि.जळगांव

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझी आई हिराबाई गव्हाणे, वडील श्री.श्रावण गव्हाणे, लहान भाऊ एकनाथ गव्हाणे व मोठा भाऊ दाजिबा गव्हाणे यांचेसह राहतो व आम्ही सर्व शेती करतो.

दि.२२.१०.२०२१ रोजी सायंकाळी मी माझे भाचे डॉ.जितेंद्र विलास सोनवणे यांचेसह अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालय येथे हजर राहुन पोलीस निरीक्षक श्री.एस.के.बच्छाव यांचेकडेस मारवड पोलीस स्टेशन येथील पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांचे विरुध्द लाचे संबधी तक्रार दिली ती खालील प्रमाणे

दि.२४.०७.२०२१ रोजी आमचे गावातील आमचे शेजारी राहणारी महिला नामे सौ.हिराबाई सुनिल अहिरे यांनी माझे वडील श्री.श्रावण गव्हाणे, लहान भाऊ एकनाथ गव्हाणे व माझे विरुध्द मारवड पोलीस स्टेशन येथे गुरनं. १०५/२०२१ भादवि कलम ३५४,४४८ वगैरे प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. आमचे विरुध्द दाखल गुन्हयाचा तपास मारवड पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांचेकडेस आहे.सदर गुन्हयात आम्ही मा.अमळनेर न्यायालयातुन अटकपुर्व जामीन घेतला आहे. त्यानंतर न्यायालयाने आम्हाला दर गुरुवारी मारवड पोलीस स्टेशन येथे हजेरी दिली आहे.

आम्ही तिघे दर गुरुवारी मारवड पोलीस स्टेशन येथे हजेरी देण्यासाठी जात होतो. त्याप्रमाणे दि.१४.१०.२०२१ गुरुवार रोजी मारवड पोलीस स्टेशन येथे हजेरी देण्यासाठी गेलो होतो. तेव्हा पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण हे पोलीस स्टेशनच्या बाहेर मला भेटले. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, तुमच्या विरुध्द दाखल गुन्हयात कोर्टामध्ये चार्जशीट लवकर दाखल करतो, त्यानंतर तुमची दर गुरुवारची पोलीस स्टेशनची हजेरी बंद करुन तुझी गावबंदीची ऑर्डर सुध्दा रदद करुन देईल व तुम्हाला गुन्हयाच्या कागदपत्रात मदत करेल, त्यासाठी तुला प्रत्येकाचे २०,०००/-रु.याप्रमाणे तुमच्या तिघांचे ६०,०००/-रु.मला द्यावे लागतील असे सांगितले. तेव्हा मी त्यांना सांगितले की, माझे जवळ एवढे पैसे नाहीत, माझे भाचे डॉक्टर आहेत, मला त्यांचेकडुन पैसे घ्यावे लागतील असे सांगुन मी पुढच्या हजेरीला येतांना माझे भाचे डॉक्टर जितेंद्र सोनवणे यांना सोबत घेवुन येईल, त्यावेळेस हि गोष्ट तुम्ही भाचे डॉक्टर यांना सुध्दा समजावुन सांगा असे सांगितले. त्यावेळी त्यांनी माझेकडुन माझे भाचे डॉक्टर जितेंद्र सोनवणे याचा मोबाईल नंबर घेतला. व त्यांनी ठिक आहे, तुम्ही डॉक्टरांना सोबत घेवुन या, मी पण त्यांच्याशी फोनवर बोलुन घेईल असे सांगितले होते. परंतु मी सदर गोष्टीकडे दुर्लक्ष केले व सदरची बाब मी त्यावेळी माझे भाचे डॉक्टर जितेंद्र सोनवणे यांना कळविली नाही.

अमळनेर पो.स्टे. भाग ६ गुरनं ... दि. २४/१०/२०२१ गुन्हा दाखल ... भ्र.प्र.अधि 1988 चे कलम 7 प्रमाणे

पोलीस ठाणे अमलदार
अमळनेर पोलीस स्टेशन

त्यानंतर माझे वडील, भाऊ व मी असे तिघे जण दि.२१.१०.२०२१ गुरुवार रोजी मारवड पोलीस स्टेशन येथे हजेरी देण्यासाठी गेलो होतो. तेव्हा पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण हे पोलीस स्टेशनला मला भेटले. त्यानंतर त्यांनी मला डॉक्टरांना सोबत आणले नाही का? असे विचारले असता, मी त्यांना सांगितले की, ते जळगांवला राहतात, उद्या परवा येणार आहेत, त्यावेळी मी त्यांना माझे भाचे डॉक्टर यांना सोबत घेवुन आपणास भेटावयास येतो असे सांगितले तेव्हा पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांनी मला सांगितले की, ठिक आहे, तु फक्त ३०,०००/-रु.मला आणुन दे, तुझे काम मी करुन टाकेल असे सांगितले.

तेव्हा पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण हे माझेकडेस ३०,०००/-रु.लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले. पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण हे गुन्हयाचे चार्जशीट कोर्टात लवकर दाखल करण्यासाठी, आमची दर गुंरुवारची पोलीस स्टेशनची हजेरी बंद करण्यासाठी व माझी गांवबंदीची ऑर्डर रदद करुन देण्यासाठी तसेच गुन्हयाचे कागदपत्रात मदत करण्यासाठी माझेकडेस ३०,०००/-रु.मागणी करीत असले बाबत मला समजले. माझी पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांना ३०,०००/-रु.लाच रक्कम देण्याची मनापासुन इच्छा नाही, परंतु मी जर त्यांना लाच रक्कम दिली नाही तर ते आमचे विरुध्द दाखल गुन्हयात कोर्टामध्ये चार्जशीट लवकर दाखल करणार नाहीत तसेच आमची दर गुरुवारची पोलीस स्टेशनची हजेरी चालु ठेवतील व माझी गावबंदीची ऑर्डर रदद करणार नाहीततसेच गुन्हयाचे कागदपत्रात मदत करणार नाहीत म्हणुन मी पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांना नाईलाजास्तव ३०,०००/-रु.लाच रक्कम देण्याचे कबुल करुन तेथुन निघुन आलो.

त्यानंतर मी त्याच दिवशी माझे भाचे डॉक्टर जितेंद्र सोनवणे यांची भेट घेवुन त्यांना पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण हे मागणी करत असलेल्या पैश्यांबाबत व कामाबाबत त्यांना सांगुन मला पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही याबाबत सांगितले. त्यावर माझे भाचे डॉक्टर जितेंद्र सोनवणे यांनी

मला पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांचे विरुध्द अॅन्टी करप्शन ब्युरो विभागाकडे तक्रार करण्याचा मला सल्ला दिला. त्यावर आम्ही अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात तक्रार देण्याचे ठरविले.

दि.२२.१०.२०२१ रोजी सकाळी माझे भाचे डॉक्टर जितेंद्र सोनवणे यांनी मला फोनव्दारे कळविले की,मला पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांचा आज सकाळी फोन आला होता व त्यांनी सांगितले की, तुमचे मामा अरुण गव्हाणे व तुम्ही गुन्हयाचे संदर्भात बोलणी करण्यासाठी केव्हा येणार आहेत? त्यावर मी त्याना सांगितले की, मी उद्या त्याच्यासहीत तुम्हाला भेटण्यास येतो असे सांगितले. सदरची बाब माझे भाचे डॉक्टर यांनी मला कळविली. त्यानंतर मी व माझे भाचे डॉक्टर जितेंद्र सोनवणे आम्ही जळगांव येथे भेटलो व आम्ही अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालय येथे तक्रार देण्याचे ठरविले.

त्यानुसार दि.२२.१०.२०२१ रोजी सांयकाळी मी व माझे भाचे डॉक्टर जितेंद्र सोनवणे यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालय येथे येवुन पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण हे आमचे विरुध्द दाखल गुन्हयात कोर्टामध्ये चार्जशीट लवकर दाखल करण्यासाठी तसेच आमची दर गुरुवारची पोलीस स्टेशनची हजेरी बंद करण्यासाठी व माझी गावबंदीची ऑर्डर रदद करण्याचा रिपोर्ट पाठविण्यासाठी माझेकडेस ३०,०००/—रु.लाच मागणी करीत आहेत बाबत तक्रार देत आहे.

सदर लाचेची बोलणी करण्यासाठी मी माझे भाचे डॉक्टर जितेंद्र सोनवणे यांना सोबत घेवुन दि.२३.१०.२०२१ रोजी सकाळी मारवड पोलीस स्टेशन येथे पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांची भेट घेण्यासाठी जाणार आहे. बाबत तक्रार दिली.ती संगणकावर टंकलिखीत करुन घेतली.

त्यानंतर दि.२२.१०.२०२१ रोजी बच्छाव साहेब यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले त्यानंतर बच्छाव साहेब यांनी दोन्ही पंचाचा सापळा पथकाचा, माझा व माझे भाचे डॉ.जितेंद्र सोनवणे अशांचा आपआपसात परीचय करून दिला.

त्यानंतर मी बच्छाव साहेब यांना कळविले की, मी व माझे भाचे डॉ.जितेंद्र सोनवणे यांचेसह पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांची भेट घेण्यासाठी मारवड पोलीस स्टेशन येथे दि.२३.१०.२०२१ रोजी जाणार असल्याने मी व माझे भाचे डॉ.जितेंद्र सोनवणे असे अमळनेर ते मारवड रस्त्यावरील धानोरा फाटा ते धानोरा गांवाकडे जाणा—या रस्त्यावर १ कि.मी.अंतरावरील एका शेता जवळ १०.३० वा.हजर राहणार आहे असे कळविले होते. तसा सविस्तर पंचनामा केला आहे.

त्यानंतर दि.२३.१०.२०२१ रोजी सकाळी १०.३० वा.मी व माझे भाचे डॉ.जितेंद्र सोनवणे असे आमचे कडील दोन वेगवेगळया मोटर सायकलींसह अमळनेर ते मारवड रस्त्यावरील धानोरा फाटा ते धानोरा गांवाकडे जाणा—या रस्त्यावर १ कि.मी.अंतरावरील एका शेता जवळ हजर होतो. त्यानंतर बच्छाव साहेब,दोन शासकिय पंच व सापळा पथक असे एका खाजगी वाहनाने सदर ठिकाणी आले.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला, माझे भाचे डॉ.जितेंद्र सोनवणे व पंच क्रं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या.त्यानंतर बच्छाव साहेब यांनी त्यांचे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डमधील मेमरीकार्डमध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण हे कुठे भेटतील? अशी विचारणा केली. तेव्हा मी बच्छाव साहेब यांना सांगितले की, माझे भाचे डॉ.जितेंद्र सोनवणे यांनी जर त्यांना त्यांचे मोबाईल फोनवर फोन लावुन विचारणा केली तर ते कुठे भेटायचे बाबत सांगतील असे कळविले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डॉ.जितेंद्र सोनवणे यांना त्यांचे मोबाईल वरुन पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांचे मोबाईल फोनवर फोन लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे डॉ.जितेंद्र सोनवणे यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन भास्कर चव्हाण यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा भास्कर चव्हाण यांनी मी पोलीस स्टेशनला आहे, मला बारा वाजुन जातील,आपण अमळनेर येथेच भेटु असे सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झाले आहे.

त्यानंतर भास्कर चव्हाण यांचा डॉ.जितेंद्र सोनवणे यांना फोन न आल्याने बच्छाव साहेब यांनी डॉ.जितेंद्र सोनवणे यांना त्यांचे मोबाईल वरुन पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांचे मोबाईल फोनवर पुन्हा फोन लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे डॉ.जितेंद्र सोनवणे यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन भास्कर चव्हाण यांचे मोबाईल फोनवर पुन्हा फोन लावला. तेव्हा भास्कर चव्हाण यांनी मी पोलीस स्टेशनला आहे, तेव्हा डॉ.जितेंद्र सोनवणे यांनी तिथंच येतो मग असे सांगितले असता भास्कर चव्हाण या, या इथंच येवुन जा असे सांगितले असता डॉ.जितेद्र सोनवणे यांनी चालेल मग येतो आम्ही असे सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झाले आहे.

त्यानंतर काही वेळाने भास्कर चव्हाण यांचा डॉ.जितेंद्र सोनवणे यांचे मोबाईल फोनवर फोन आला. परंतु सदरचा कॉल डॉ.जितेंद्र सोनवणे यांनी स्विकारला नाही. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डॉ.जितेंद्र सोनवणे यांना त्यांचे मोबाईल वरुन पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांचे मोबाईल फोनवर फोन लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे डॉ.जितेंद्र सोनवणे यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन भास्कर चव्हाण यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा भास्कर चव्हाण यांनी कुठे आहे? असे विचारले असता डॉ.जितेंद्र सोनवणे यांनी भास्कर चव्हाण यांना गाडीवर आहे,येतो आहे असे सांगितले.सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झाले आहे.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे शर्टच्या आतुन गळयात लटकवुन दिले.त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह माझे मोटार सायकलने व डॉ.जितेंद्र सोनवणे यांना त्यांचे मोटार सायकलने भास्कर चव्हाण यांची भेट घेण्यासाठी मारवड पोलीस स्टेशन येथे पाठविले होते. तेव्हा सापळा पथक हे सदर ठिकाणी थांबुन होते. त्यानंतर मी व पंच क्रं १ असे माझे मोटार सायकलवर व डॉ.जितेंद्र सोनवणे हे त्यांचे मोटार सायकलवर सदर ठिकाणाहुन निघुन मारवड पोलीस स्टेशन येथे गेलो. तेव्हा भास्कर चव्हाण हे पोलीस स्टेशनच्या बाहेरच उभे दिसले. त्यानंतर मी,डॉ.जितेंद्र सोनवणे व पंच क्रं.१ असे भास्कर चव्हाण यांचेजवळ गेलो. तेव्हा भास्कर चव्हाण यांनी फक्त दहा दिवसात रवाना करुन देतो, चार्जशीट पाठवणं माझे हातात आहे असे सांगितले. त्यानंतर मी, डॉ.जितेंद्र सोनवणे व भास्कर चव्हाण यांचेत माझे व माझे कुटुंबियांचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाबाबत चर्चा झाली. त्यानंतर भास्कर चव्हाण यांनी माझे नमुद कामाच्या मोबदल्यात माझेकडेस तडजोडीअंती १५,०००/—रु.लाचेची मागणी केली व भास्कर चव्हाण यांनी अमळनेर येथे घरी येण्यास सांगितले. त्यानंतर मी,डॉ.जितेंद्र सोनवणे व पंच क्रं.१ असे सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझेत, डॉ.जितेद्र सोनवणे व पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांचे मधील झालेले संभाषण दोन्ही पंचानी बच्छाव साहेब व सापळा पथकाने ऐकले.सदरचे संभाषण ऐकुण बच्छाव साहेब, दोन्ही पंचाची व सापळा पथकाची लाच मागणी बाबत खात्री झाली. तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेली १५,०००/— रू. रक्कम (त्यात ५००/—रू.दराच्या ३० नोटा) बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केले. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी सदर नोटांना अ.पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या. तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही अमळनेर शहरातील रेल्वे स्टेशन जवळ जावुन करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर बच्छाव साहेब व सापळा पथक असे सोबत आणलेल्या खाजगी वाहनाने मी तसेच डॉ.जितेंद्र सोनवणे असे आमच्या मोटार सायकलने सदर ठिकाणाहुन रवाना होवुन अमळनेर शहरातील रेल्वे स्टेशन जवळ आलो.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला, डॉ.जितेंद्र सोनवणे व पंच क्रं.१ अशांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर डॉ. जितेंद्र सोनवणे यांचे मोबाईल फोनवर भास्कर चव्हाण यांचा फोन आला. तेव्हा डॉ.जितेंद्र सोनवणे यांनी भास्कर चव्हाण यांना कुठे आहे? असे विचारले तेव्हा भास्कर चव्हाण यांनी घरीच आहे असे सांगितले. तेव्हा डॉ.जितेंद्र सोनवणे यांनी घरी येवु का मंग असे विचारले असता भास्कर चव्हाण यांनी ठिक आहे असे सांगितले.त्यानंतर फोन बंद झाला.सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झाले आहे.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा सुरु करुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला व पंच क्रं.१ अशांना माझे मोटार सायकलने व डॉ.जितेंद्र सोनवणे यांना त्यांच्या मोटार सायकलने पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांना भेटण्यासाठी अमळनेर शहरातील जुनी पोलीस लाईन,अमळनेर येथील भास्कर चव्हाण यांचे शासकिय निवासस्थान येथे पाठविले होते. तेव्हा बच्छाव साहेब यांनी भास्कर चव्हाण यांचे शासकिय निवासस्थानाच्या आजुबाजुस सापळा लावला होता. तेव्हा मी, डॉ.जितेंद्र सोनवणे व पंच क्रं. १ असे भास्कर चव्हाण यांचे शासकिय निवासस्थानी गेलो. त्यानंतर भास्कर चव्हाण यांनी आम्हाला त्यांचे रहाते घरात सोफा सेटवर बसण्यास सांगितले. त्यानंतर मी माझे शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिशात असलेले १५,०००/—रुपये (त्यात ५००/— रुपये दराच्या ३० नोटा) लाच रक्कम माझे उजव्या हाताने खिश्यातुन बाहेर काढुन सदरची रक्कम भास्कर चव्हाण यांचे समोर धरली असता त्यांनी त्यांचे जवळच असलेल्या एका लाकडी टि पॉयकडे उजव्या हाताचा बोटाचा इशारा करुन सदर लाच रक्कम ठेवा तिकडे असे सांगितले. तेव्हा मी भास्कर चव्हाण यांना नही हो, मोजुन घ्या तुम्ही, असे सांगितले असता त्यांनी सदर लाच रककम लाकडी टि पॉयवर ठेवण्यास सांगितली. त्यांनी सांगितल्या प्रमाणे सदर लाच रक्कम मी लाकडी टि पॉयवर ठेवुन दिली.

त्यानंतर माझेत, डॉ.जितेंद्र सोनवणे व भास्कर चव्हाण यांचेत माझे कामाबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास इशारा केला. तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यास रंगेहाथ पकडले. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी भास्कर चव्हाण यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव भास्कर नामदेव चव्हाण, वय ५१, व्यवसाय नोकरी, पोलीस नाईक ब.नं.२३५५, नेमणुक मारवड पोलीस स्टेशन ता.अमळनेर जि.जळगांव रा.जुनी पोलीस लाईन, अमळनेर ता.अमळनेर,जि.जळगांव असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालय येथे जावुन करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये पोलीस कर्मचारी भास्कर चव्हाण, माझे व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील उर्वरीत सापळा कारवाई केली आहे. तसा पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी भास्कर नामदेव चव्हाण, पोलीस नाईक ब.नं.२३५५, नेमणुक मारवड पोलीस स्टेशन ता.अमळनेर जि.जळगांव यांनी दि.२३.१०.२०२१ रोजी पंचासमक्ष माझे व माझे कुटुंबिय यांचे विरूध्द दाखल गुन्हयाचे चार्जशीट कोर्टात लवकर दाखल करण्यासाठी, माझे व माझे कुटुंबिय यांची दर गुरुवारची पोलीस स्टेशनची हजेरी बंद करण्यासाठी व माझी गांवबंदीची ऑर्डर रदद करण्याचा रिपोर्ट पाठविण्यासाठी तसेच गुन्हयाचे कागदपत्रात मदत करण्यासाठी माझेकडेस तडजोडीअंती १५,०००/–रु. लाच मागणी केली व सदर लाच रक्कम आरोपी भास्कर नामदेव चव्हाण यांनी दि.२३.१०.२०२१ रोजी १७.४१ वा. अमळनेर शहरातील जुनी पोलीस लाईन,अमळनेर येथील भास्कर चव्हाण यांचे शासकिय निवासस्थान येथे स्वत: स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी भास्कर नामदेव चव्हाण यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

(signature)

एस.के.बच्छाव
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

फिर्यादीची सही

(signature)

पंचांच्या सह्या दि० २३/१०/२०२१

(१) (signature)

(२) (signature)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** अमळनेर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0469 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/10/2021 00:43 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 23/10/2021
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/10/2021
   **Time From (वेळेपासून):** 17:41 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:41 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/10/2021 **Time (वेळ):** 00:05 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/10/2021 00:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 4 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जुनी पोलीस शासकिय वसाहत

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अरुण श्रावण गव्हाणे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पाडसे ता अमळनेर ,अमळनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पाडसे ता अमळनेर ,अमळनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भास्कर नामदेव चव्हाण | | | 1. जुनी पोलीस लाइन अमळनेर खाते पो, अमळनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 15000 | 15,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 15,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

अमळनेर पोस्टे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि.सन 1988(संशोधन 2018 चे) कलम 7, प्रमाणे फिर्यादी - अरुण श्रावण गव्हाणे वय 39 धंदा शेती रा पाडसे ता अमळनेर. आरोपीचे नाव 1) भास्कर नामदेव चव्हाण वय 51 धंदा नोकरी पोलीस नाइक बक्कल नंबर 2355 नेमणुक मारवड पोलीस स्टेशन ता अमळनेर जि जळगाव राहणार जुनी पोलीस लाइन अमळनेर खाते पोलीस वर्ग 3अ.घ.ता.वेळ ठिकाण दि. 23.10.2021 रोजी 17.41 वाजता अमळनेर शहरातील जुनी पोलीस शासकिय वसाहत येथे.लाचेची मागणी - 30000/- रुपये (तिस हजार रुपये)लाच स्विकारली - 15000/- रुपये अक्षरी पंधरा हजर रुपये मात्र.तपशील यातील फिर्यादी व त्यांचे कुटुंबीय यांचे विरुध्द मारवड पोलीस स्टेशन येथे गुरनं 105/2021 भादंवि कलम 354,448 वगैरे प्रमाणे गुन्हा दाखल आहे सदर गुन्ह्याचे चार्जशिट लवकर दाखल करण्यासाठी व फिर्यादी व त्यांचे कुटुंबीय यांची दर गुरुवारी पोलीस स्टेशन ची हजेरी बंद करण्यासाठी व फिर्यादी यांचा गावबंदीची आर्डर रदद करण्याचा रिपोर्ट पाठविण्यासाठी तसेच गुन्ह्याचे कागदपत्रात मदत करण्यासाठी फिर्यादी यांचेकडेस आरोपी म यांनी 30000/-रुपये लाच मागणी करीत असल्या बाबत दिनांक 22/10/2021 रोजी अन्टी करप्शन ब्युरो येथे तक्रार दिली होती.सदर तक्रारीची अन्टी करप्शन ब्युरो जळगाव पथकाने दिनांक 23/10/2021 रोजी पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी वर नमद कामाचा मोबदल्यात फिर्यादी यांचे कडेस तडजोडीअंती 15000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी यांनी वर नमुद तारीख व वेळी व ठिकाणी स्वता स्वीकारली म्हणुन गुन्हा.

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेहरा के रंग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (चा स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त याठिकाणी नोंद घेतली जाईल.)

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**or (किंवा)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** ~~Milind Ashok Bharambe~~

**Rank (पद):** HC (Head Constable)

**No.(क्र.):** PCMH89664 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** Jaipal Manikrao Hire
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMH91149